दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

संपादक : अजय भांगे

vadalvartanews@gmail.com

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | गुरुवार दि.१ जानेवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १२८ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Thrusday 1 January 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 128 | Pages 4 | Rate 4 Rs










## केजच्या विकासाचा धुरंधर नेता

# अष्टपैलू नेतृत्व हारुण इनामदार

## जनविकास परिवर्तन आघाडीच्या स्थापनेने केज तालुक्याच्या विकासाला मिळाली नवी दिशा

केज (प्रतिनिधी)-केजच्या सर्वसामान्य कुटुंबात जन्म होऊनही कर्तृत्व, संघटन कौशल्य, जनतेमध्ये सुसंवाद निर्माण करण्याची क्षमता आणि सर्व समाजघटकांना न्याय मिळवून देण्याचा ध्यास या गुणांमुळे हारुण इनामदार हे नाव आज केज तालुक्यातील जनतेत विश्वासाचे प्रतीक बनले आहे. राजकीय आणि सामाजिक उंची कितीही गाठली तरी मातीशी नाळ जोपसलेला नेता म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे.दलित, वंचित, कष्टकरी, मजूर, शेतकरी, कामगार, आठरापगड जाती-धर्मातील लोकांना बरोबर घेऊन काम करण्याची त्यांची हातोटी उल्लेखनीय मानली जाते. गरजूंना मदतीचा हात, प्रश्नांवर ठाम भूमिका आणि विकासात्मक दृष्टीकोन यामुळे हारुण इनामदार यांनी अल्पावधीतच केज तालुक्यात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

### मातीशी जोडलेली शैली-साधेपणात मोठेपण

उंची पदे, सत्तेचा दरारा असूनही त्यांचा स्वभाव मितभाषी आणि जमिनीवरचा आहे. गावोगावी, शेतशिवारात, सर्व सामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे, संकटात धावून जाणारे नेतृत्व म्हणून त्यांनी जनतेचा विश्वास जिंकला आहे.

### विकास हीच दिशा-जनता हीच ताकद

हारुण इनामदार यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या जनविकास परिवर्तन आघाडीने जनतेला सहभागाची नवी दिशा दिली आहे.विकास हीच दिशा आणि जनता हीच ताकद या ब्रीदवाक्यासह केज तालुक्याच्या प्रगतीसाठी त्यांनी घेतलेली धडपड जनतेत आशावाद निर्माण करीतहोती,करत आहे व करीत राहील .

### जनविकास परिवर्तन आघाडीची भक्कम उभारणी

सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि केजच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी हारुण इनामदार यांच्या पुढाकारातून जनविकास परिवर्तन आघाडीची स्थापना करण्यात आली. या आघाडीच्या माध्यमातून:पाणीपुरवठा व जलसंधारण,रस्ते व पायाभूत सुविधा, शिक्षण व आरोग्य सेवा, युवकांसाठी रोजगारनिर्मिती, महिलांसाठी स्वावलंबन योजना, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस पाठपुरावा,या क्षेत्रांत नियोजनबद्ध काम सुरू असल्याने नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे.



### नववर्षात साजरा होणारा वाढदिवस ;उत्साहाचे वातावरण

हारुण इनामदार यांचा वाढदिवस १ जानेवारी म्हणजेच आज नववर्ष दिनीसाजरा होत असल्याने कार्यकर्ते, चाहत्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण आहे. वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, स्वच्छता मोहिमा,विद्यार्थी मार्गदर्शन शिबिरे, गरजूंना धान्य व वस्तूंचे वाटप आदी सामाजिक उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### केजच्या विकासाचा धुरंधर नेता

हारुण इनामदार यांनी केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष कृतीवर भर दिला. गरजूंना मदत, रुग्णांना वेळीच उपचार मिळवून देणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, कष्टकरी मजुरांसाठी पाठपुरावा, तालुक्यातील प्रश्नांना शासनदरबारी आवाज देणे या कामांमुळे ते केजच्या विकासाचा धुरंधर नेता म्हणून ओळखले जातात.





# संपादकीय

## भविष्यवेत्त्यांच्या नजरेतून २०२६



भविष्यामध्ये काय घडेल याचे कुतूहल, भीती, चिंता आणि भय प्रत्येकाला असते. त्यामुळेच भविष्याची काळजी करतो. ही जगभरातील मानवजातीची कथा आहे. त्यामुळेच भविष्यवेत्त्यांचे २०२६ बाबत काय संकेत मिळतात, पाहू या.

२०२५ची अखेर आणि २०२६ ची सुरुवात कालचक्र नव्या वळणावर नेणारी आहे. भविष्याच्या कुशीत काय दडले आहे, याबद्दल जाणून घेण्याची, आडाखे बांधण्याची तसेच अंदाज व्यक्त करण्याची मानवी भावना काही नवी नाही. भविष्याविषयी जाणून घेण्यासंदर्भात प्रसिद्ध असणाऱ्या काही अभ्यासशाखाही आपण जाणतो. यातील तज्ज्ञ, अभ्यासू वा भाकीत वर्तवण्याची 'शक्ती' असलेले काही लोक हे काम दरवर्षी करतच असतात. असे असताना नववर्षात पाऊल ठेवताना आपणही भविष्याची चाचपणी करायला काय हरकत आहे? चला तर, २०२६ या वर्षाबद्दल भविष्यसूचक स्फटिकाचा गोळा काय म्हणतो, हे जाणून घेऊ या. जगातील महत्त्वाच्या भविष्यवाण्यांमध्ये प्रसिद्ध फ्रेंच भविष्यवेत्ता नॉस्ट्राडेमस यांच्या भाकितांचा अग्रक्रमाने समावेश होतो. म्हणूनच त्यांच्या भविष्यवाण्यांचे विविध प्रकारे अर्थ लावले गेले आहेत. त्याने सूचित केलेल्या घटनांमध्ये दोन महायुद्धे, हिरोशिमा आणि नागासाकीवर केले गेलेले अणुबॉम्बस्फोट तसेच अमेरिकेतील ९/११ चा दहशतवादी हल्ला यांचा समावेश होता. या सर्व भविष्यवाण्या १५५५ मध्ये लिहिल्या गेल्या होत्या. लेखनाच्या संकेतात्मक भाषेतून त्याचे विविध अर्थ निघू शकतात आणि त्यामुळेच इतिहासकार अनेकदा त्यांच्या भविष्यवाण्यांच्या विश्वासार्हतेवर वादही घालतात. या पार्श्वभूमीवर बघायचे तर २०२६ साठीच्या नॉस्ट्राडेमसच्या भविष्यवाण्याही जागतिक पातळीवर लक्षणीय अशांतता दर्शवतात.काही अभ्यासकांतर्फे असेही सूचित होते की, पुढील काळात हवामान आपत्ती आणि तांत्रिक बदल मोठ्या प्रमाणात बघायला मिळतील. दुसरीकडे, बाबा वांगा या एका आदरणीय बल्गेरियन भविष्यवेत्त्याने भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक आणि तीव्र हवामान बदल यासारख्या महत्त्वाच्या आपत्तींबद्दलच्या भाकितांनिशी हे वर्ष कसे असेल, याचा प्राथमिक अंदाज दिला आहे. यंदा अशा पर्यावरणीय बदलांमुळे जगातील अनेक भागांमध्ये पूर, त्सुनामी आणि इतर अत्यंत गंभीर घटना घडू शकतात आणि त्यामुळे जगभरातील काही प्रदेश आणि क्षेत्रांवर विपरित परिणाम होऊ शकतो, असे सूचित करण्यात आले आहे. २०२६ मध्ये इथिओपिया, अमेरिका, म्यानमार, दक्षिण सुदान, गांबिया, सुदान, रशिया, झांबिया, दक्षिण आफ्रिका आणि थायलंड या देशांमध्ये सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. असे असताना जगभरातील प्रत्येक शंभर लोकांपैकी अंदाजे सात ते आठ लोक निवडणुकीशी संबंधीत विपरित घटनांमुळे प्रभावित होऊ शकतात, असे दर्शवण्यात आले आहे. यंदा देशात पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, आसाम आणि पुद्दुचेरीमध्ये विधानसभा निवडणुकांची तयारी असणार आहे. पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पक्ष तृणमूल काँग्रेसच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना आव्हान देत आहे. तामिळनाडूमध्ये अण्णा द्रमुक-भाजप युती द्रमुकला सत्तेवरून हाकलून लावण्याचा प्रयत्न करत आहे. केरळमध्ये भाजप सातत्याने ताकद वाढवत असला तरी डावी लोकशाही आघाडी (एलडीएफ) आणि संयुक्त लोकशाही आघाडीमध्येच खरी लढत होईल. आसाममध्ये सध्या भाजप सत्तेत असले तरी आगामी निवडणुकांमध्ये राज्यात प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी त्यांना प्रयत्न करावे लागतील.जगाचा विचार करता सध्या जागतिक अर्थव्यवस्था मंदावली आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास जिंकण्यासाठी अर्थजगताला जोरदार प्रयत्न करावा लागेल. कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये गुंतवणूक केल्याने परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. मात्र भाकीतांचा अंदाज घेता वेगवेगळी आर्थिक धोरणे आणि उच्च सार्वजनिक कर्जाचे निरीक्षण करणे महत्त्वाचे ठरणार आहे. आताच रशिया आणि चीन संसाधनांसाठी स्पर्धा करत आहेत. येत्या काळात त्यांच्यामधील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता भविष्यवेत्ते दर्शवतात. सध्याची स्थिती तरी या इशाऱ्यांशी सुसंगत आहे. बल्गेरियन भविष्यवेत्ता बाबा वांगा यांनी देखील आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे. २०२६ मध्ये येणारी अपेक्षित मंदी व्यापार तणाव आणि लोकसंख्याशास्त्रीय बदलांमुळे, विशेषतः विकसित देशांमध्ये वाढत असलेल्या वृद्धांच्या लोकसंख्येमुळे गडद होण्याची शक्यता आहे. 'गोल्डमन सॅक्स रिसर्च'चा अंदाज आहे की, २०२६ मध्ये बहुतेक प्रमुख अर्थव्यवस्था पूर्वीच्या अपेक्षेपेक्षा वेगाने वाढतील. जागतिक व्यापार शुल्कांमधील धक्क्यांमुळे आणि देशांतर्गत धोरणांमुळे २०२६ आणि त्यानंतरच्या आर्थिक वर्षासाठी भारताचा आर्थिक दृष्टिकोन प्रभावित राहण्याचा अंदाज आहे. २०४७ पर्यंत विकसित देशाचा दर्जा मिळवण्यासाठी सरकारला देशांतर्गत उत्पादनवाढीला चालना देणे, परकीय गुंतवणूक वाढवणे आणि जागतिक बाजारपेठांमध्ये व्यापार वाढवणे गरजेचे ठरेल. भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. २०२६ मध्ये भारताचे परराष्ट्र धोरण शेजारी राष्ट्रांशी जुळवून घेण्याच्या उपक्रमांवर भर देणारे राहील. त्याचबरोबर देश संरक्षण आणि आर्थिक सहकार्य वाढवून 'क्वाड'द्वारे अमेरिका आणि युरोप, विशेषतः जर्मनीसोबत आपली धोरणात्मक भागीदारी मजबूत करेल. थोडक्यात, भारताचे २०२६ चे परराष्ट्र धोरण दृढनिश्चयी असणार असून विविध देशांशी मजबूत भागीदारी निर्माण करणे, जागतिक नेतृत्वक्षमता वाढवणे आणि जटिल भू-राजकीय परिस्थितीत राष्ट्रीय विकास सुनिश्चित करणे हे असेल.

# पोलीस,पत्रकार,पुढारी,आणि खंडणी-दरोडा

लोकशाही ही सांसद, न्यायपालिका, कार्यपालिका, पत्रकारिता या चार स्तंभावर उभी असते. हे चार स्तंभ एकमेकाला पुरक असतात. या चार स्तंभा पैकी एकाही स्तंभाचा घात झाला वा त्याला वाळवी लागली, तर लोकशाहीचा डोलारा कोसळल्याशिवाय राहणार नाही. आपल्या देशातील लोकशाही ही देखील चार स्तंभावरच उभी आहे.या लोकशाहीला स्वातंत्र्यासाठी ७८ वर्षाचा कालावधी लोटतो आहे. आणि प्रजासताक दिनाला ७५ वर्षाचा अवधी झाला आहे. मग, आपल्या देशातील लोकशाही लोकशाही पद्धतीने हाकली जाते काय ? हाकली गेली आहे काय? तर त्याचे उत्तर हे नाहीच असे असेन.कारण इथली संपूर्ण व्यवस्थाच मनुवाद्याच्या,भांडवलदारांच्या, लुटारुंच्या हातात आहे. त्यामुळे त्यांनी लोकशाहीची पुरती वाट लावून टाकली आहे.

लोकशाहीमध्ये निवडणुका लढल्या जात आहेत. त्या पूर्णतः पैशाच्या - ताकदीच्या जोरावर लढल्या जात आहेत. त्यासाठी कितीही पोलीस बंदोबस्त लावला वा सीबीआयचे जाळे पेरले तरी सामान्य जनतेला वेगवेगळी आमिषे दाखवून, भीती दाखवून, जीवे ठार मारण्याची धमकी देऊन, किंवा त्यांच्या कुटुंबाला वेठीस धरून निवडणुका लढल्या गेल्या आहेत. आणि जात आहेत, जाणार आहेत. हा, निवडणुकीचा डाव कित्येक दशके सुरूच आहे. या निवडणुकीच्या काळात वेगवेगळे राष्ट्रीय पक्ष, प्रादेशिक पक्ष आपल्या निवडणुकीच्या जाहिरनाम्यात जनतेसाठी आश्वासनाची खिरापत वाटत असतात. आणि सर्व जनता ही मोठ्या विश्वासाने त्या पक्षावर अंधविश्वास ठेवून त्या पक्षाला निवडून देत असते. मग, निवडून आलेल्या पक्षाने त्या लोकांना दिलेल्या जाहिरनाम्यातील वचनपूर्ती केलेली आढळून येते का? तर त्याचे उत्तर नाहीच असे असेल . त्याचे कारण अजूनही सामान्य जनता अन्न, वस्त्र, निवारा, पाणी, औषधे, शिक्षण, आरोग्य, आदी मुलभूत गरजांपासून कोसो दूर आहे. ह्या, मुलभूत समस्यांवर करोडो - अब्जो रुपयांचा निधी खर्च केला जातो, त्या निधीचा विनियोग खरोखर तेव्हढा केला जातो का? हा खरा प्रश्न आहे. आणि ह्या प्रश्नांच्या विळख्यात सामान्य जनता भरडली गेली आहे. कारण इथेच भ्रष्टाचाराचे कुरण संपता - संपत नाही. आणि हे विदारक सत्य सामान्य जनतेला समजत नाही असे नाही. परंतु ही सामान्य जनता तीन माकडासारख्या अवस्थेत जगू पाहते आहे. त्यांना त्यासंबंधी विचारले असता, आपल्याला काय करायचे? सर्व राज्यकर्तेच नालायक!!! मग, ते कोणत्याही पक्षाचे असो, सर्व सारे एका माळेचे मणी अशी मानसिकता असल्याने लोकशाहीत राज्यकर्त्याच्या विरोधात कुणा पुढाऱ्याने वा सामाजिक कार्यकर्त्याने त्याविरोधात आवाज उठविला तर ही सत्तेतील राजकीय मंडळी आपल्या राजकीय शक्तीचा गैरवापर करून पोलीसांना हाताशी धरून त्या सामाजिक कार्यकर्त्यांचा, पत्रकारांचा, वा पुढाऱ्याचा काटा काढते. आणि त्याला आयुष्यातून उठविण्याचा घाट घालते. अथवा त्यांचेवर खोटेनाटे आरोप करून त्यांना बदनाम करून संपविते. असेच कटकारस्थान रचून माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी निवडणुकीच्या कार्यकाळात बहुजन मुक्ती पार्टीचे नेते राजरत्न आंबेडकर हे आमदारकी पदाच्या शर्यतीत उभे ठाकलेले पाहून त्यांना शह देण्यासाठी अशोक चव्हाण यांनी आपल्या साम-दाम-दंड भेद नीतीचा वापर करून त्यांचेवर खंडणी - दरोड्याचा गुन्हा दाखल करून त्यांना मारझोड केली होती. त्यासाठी पोलीस प्रशासनातील सुपारी बहादुर पोलीस अधिकारी कबाडे आदीनी त्यांना मारझोड केली होती. आणि हे कृत्य त्यांनी सत्तेचा माज आल्याने त्यांनी त्यांच्यावर आगपाखड करण्याचा प्रयत्न केला त्यांचा उद्देश्य काय होता तर त्यांनी निवडणूकीतून माघार घ्यावी वा तडजोड करावी. परंतु बहुजन मुक्ती पार्टीचे नेते राजरत्न आंबेडकर यांनी या भिकाऱ्यांना कसलीच भीक घातली नाही .त्यामुळे त्यांनी ही खेळी खेळली. याठिकाणी सांगण्याचे तात्पर्य असे कि, लोकशाहीतील ही मस्तवाल, मुजोर, राजकीय नेते मंडळीच्या विरोधात कुणीही ब्र केला तर त्याचा गेम झाल्याशिवाय राहणार नाही असे हे बोलके उदाहरण आहे. अशी बोलकी उदाहरणे भरपूर आहेत . ज्यामुळे ईडी, आयकर विभाग, सीबीआय विभागाच्या धाडसत्राने कित्येकांची पाचावर धारण बसली आहे. यासंबंधी त्यांचा मागोवा घेतल्यास त्यासंबंधी एक पुस्तक लिहिले जाईल. परंतु हे सूडाचे राजकारण समाजाच्या, देशाच्या हिताच्यादृष्टीने योग्य आहे का?

ही गत सामाजिक कायकर्त्याची - पुढाऱ्यांची आहे. तीच गत पत्रकारांची होती. कुणा एका पत्रकाराने राजकीय पुढाऱ्यांची वा नेत्यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे त्यांच्या ( स्त्रीयासंबंधीची ) अनैतिकतेची प्रकरणे उजेडात आणली तर ती राजकीय नेते मंडळी पुन्हा एकदा कुणा लोंबत्या? पोलीस प्रमुखांना हाताशी धरून त्या पत्रकाराच्या आर्थिक परिस्थितीचा, कमजोरीचा आढावा घेऊन त्या पत्रकाराला पैशाच्या आभिषाद्वारे, लाचेद्वारे , गप्प करण्याचा प्रयत्न करतात . त्यांचेवर खोटेनाटे आरोप करून खंडणीचा गुन्हा दाखल करून त्याला जेरबंद करून त्याचे आयुष्य उध्वस्त करतात आणि हे न जमल्यास त्या पत्रकाराची मजबूरी ओळखून कुणा विषकन्येचा वापर करून रूपवान, गोऱ्यापान तरुणीला त्या पत्रकाराकडे पाठवितात. आणि मग, ती विषकन्या योजलेल्या करकारस्थानाप्रमाणे त्या पत्रकाराला जाळ्यात अडकवते. आणि त्याचेकडून आपली नको तो हौस भागवून घेते आणि नंतर मोठमोठ्याने आरडाओरड करून विनयभंग झाल्याचा कांगावा करून गुन्हा दाखल करून त्या पत्रकाराचे आयुष्य बरबाद करते. त्यावेळी देखील सुडाने पेटलेली ही राजकीय मंडळी ( लॉबी ) त्या पत्रकाराला आयुष्यातून उठविते.

त्यावेळी देखील पत्रकार क्षेत्रातील स्वतःला जगमान्य म्हणणारी पत्रकार मंडळी त्या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन सत्यतेचा शोध घेत नाही. त्यावेळी कुणीही हा सूर्य आणि हा जयद्रथ असा भेद करीत नाही. अगदी बैलाप्रमाणे, गुलामाप्रमाणे, मालकांच्या पुढे गोंडा घालीत राहतात. त्यामुळे पोलीसांना सामाजिक कार्यकर्त्यांना, गुंडांना, माफियांनां, पत्रकारांना बळी देणे हा हातचा मळ झालेला आहे. अगदी कुणीही यावे अन् टपली मारून जावे अशी करून घेतली आहे. त्यामुळेच पत्रकारांच्या मागण्या अजूनही मान्य होत नाही. याउलट त्यांच्या हत्येत वाढच होत चालली आहे. ज्याचा दुष्परिणाम शशिकांत वारिशे सारख्या पत्रकाराला भोगावा लागला आहे. तसाच भोग दै. आपलं महानगर चे संपादक निखिल वागळे यांना ही भोगावा लागतो आहे. ज्यामुळे त्यांच्यावर झालेल्या हल्ल्यातून बचावले, अन्यथा त्यांचेही काही खरे नव्हते. एवढी भयावह अवस्था सत्ताधीशांनी करून ठेवली आहे. तरी देखील ह्या भ्याड हल्ल्यांच्या निषेधार्थ त्यावेळेस मुंबई मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख, किरण नाईक, शरद पाबळे, राजा आदाटे, दिपक केतके, सानप, दिपक पवार यांचे सह मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, सचिव संदीप चव्हाण, राही भिडे, विष्णू सोनवणे, स्वाती घोसाळकर, तसेच प्रेस क्लबचे आणि त्यांचे सहकारी आणि मुंबई महानगर पालिकेचे अध्यक्ष मारुती मोरे सह त्यांचे सहकारी, मंत्रालय आणि विधीमंडळ पत्रकार संघाचे अध्यक्ष दत्ता डोईफोडे सह त्यांचे सहकारी , टिव्ही व फोटो जर्नालिस्टचे अध्यक्ष सह त्यांचे सहकारी यांनी तातडीने निषेध मोर्चाचे आयोजन केले. आणि त्यात सरकारच्या दडपशाही विषयी रोष व्यक्त करून पत्रकारावर होणाऱ्या हल्ल्या वियेधात, अन्याय -अत्याचार विरोधात कठोर उपाययोजना करून पत्रकार संरक्षण कायद्याच्या अंमबजावणीची मागणी केली गेली. परंतु सरकारची उदासिन भूमिकाच याकामी दिसून येते आहे. मग, सरकारला पत्रकारांचे मुडदे हवेत काय?

परंतु अशीच पत्रकारांच्या हत्येत वाढ होत राहिली तर आपल्या राज्याचे मुख्यमंत्री आणि त्यांच्या मंत्री महोदयांना हर्षवायू भरणार आहे काय? का? स्वतःला अत्यंत मोठे पत्रकार म्हणवणाऱ्या त्या पत्रकाराच्या लॉबीला आनंद होणार आहे? ज्याच्यामुळे साप्ताहिक, पाक्षिक, मासिक अगदी नियतकालिका इतकेच काय तर अनियतकालिकांतील ही पत्रकारांना ही ( सुखसुविधांपासून ) शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेता येत नाही तसेच शासकीय कार्यक्रमाचा वृत्तांत घेता येत नाही. अगदी षंढाप्रमाणे पत्रकारांची ही वाताहात सुरूच आहे अशी ही पत्रकारांची दयनीय अवस्था असताना आपल्या देशातील मुर्दाड झालेली जनता ही काहीही बोलत नाही. कुणी ही त्या दडपशाही विरोधात बंड करीत नाही . कारण सारी जनता षंढ झाली आहे? काय ?सारा समाज षंढ झालाय? अरे, चोरांची टोळी असते, त्या चोरांच्या टोळीला हात लावून दाखवा. त्या चोरांचा थाडसीपणा पाहून आपण हतबल होऊ, इतकेच काय तर त्या वारांगणेला इमान आहे. त्या एका बाईला भररस्त्यात कुणी शरीर सुखाची मागणी केल्यास तीचेही इमान जागे होईल अशी माणसे स्वतःच्या अस्मितेसाठी पेटू शकतात तर हा मर्दमुकीचा डंका मारणारा षंढ ? समाज मर्द केंव्हा होणार? का? षंढ म्हणून जगणार आणि षंढ म्हणूनच मरणार.? अर्थात लोकशाहीत लोकांनी आपल्या हक्कांसाठी जीवाचे रान केले पाहिजे. त्यासाठी बलिदानाची तयारी ठेवली पाहिजे. त्यासाठी संविधानाचे वाचन केले पाहिजे . प्रत्येक कलमांचे अध्ययन केले पाहिजे . आपल्या हक्कांचे रक्षण केले पाहिजे. आणि ही अभिनव मोहिम आपण राबविली पाहिजे. ज्यावेळेस संविधानातील ज्ञानरूपी अमृताचा एकएक कण आपण प्राशन करू त्यावेळी जगण्याची उर्मी वाढत जाऊन राजकिय पुढाऱ्यांनी - पोलीसांनी आपल्यावर किती - किती अन्याय अत्याचार केले तर त्याचे यथार्थ दर्शन घडेल कारण आजमितीला अनेक आरोपींना खोट्या गुन्ह्याखाली तुरुंगात शिक्षा भोगावी लागते आहे. अशा कित्येकांना खोट्या गुन्ह्याखाली अटक झाल्यानंतर त्यांच्या आयुष्याची वाताहत झाली आहे हे सारे कशाचे द्योतक आहे.

काही पोलीस प्रशासनातील काही सुपारी ... पोलिसांनी आपल्या खुर्चीखाली किती.... अंधार आहे हे पाहिले पाहिजे. कारण सामाजिक कार्यकर्ते, पुढारी, पत्रकार, सामान्य जनता आदी घटकांनी तुमच्याही मुळाशी जाऊन तुमचा पिच्छा पुरविला तर किती... किती ... गुन्हयाखाली तुम्हीही तुरुंगात जाऊ शकता याचाविचार केला काय? अगदी मटका, जुगार, अंमली पदार्थ, वेश्याव्यवसाय, आदी अवैध धंद्यापासून ते हातभट्टीच्या धंदयापर्यंत लाखो करोडो रुपयांचा हप्ता राजरोसपणे मिळत असतो त्याचे काय? हमाम में सब नंगे है! ना! अशी ही वास्तविकता असल्याने मालवणीच्या हातभट्टीकांडात जवळजवळ १५० व्यक्तींना आपला जीव गमवावा लागला. त्यावेळेस कारवाई म्हणून त्या पोलीस ठाण्याच्या पोलीस निरिक्षकांपासून अंमलदारांना सस्पेन्ड केले गेले. परंतु हीच कारवाई अगदी कठोर कारवाई केली असती तर त्या पोलीस आयुक्त ,सहपोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त पर्यंत तडकाफडकी सेवामुक्त केले पाहिजे होते. ज्यामुळे अशाप्रकारच्या अवैध धंद्यांना प्रोत्साहन मिळणार नाही आणि नाही कुणा निरपराधांचे..... जाणार. परंतु अशा सुपारीबाजांना,हफ्तेखोरांना? तुरुंगात टाकल्यास कुणा निरपराधांचा बळी घेताना हजारदा विचार करतील? आणि कुणा राजकीय... पुढाऱ्यांचे, सामाजिक कार्यकर्त्यांचे, पत्रकारांचे आयुष्य उध्वस्त करताना त्यांचे हात थरथरल्या शिवाय राहणार नाही. मग, त्यासाठी कुणा पोलीस प्रशासनातील ही पोलीस अधिकाऱ्यांचा वा पोलीसांचा बळी जाता कामा नये.


त्यासाठीच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री,गृहमंत्री महोदयांनी देखील सामान्य जनते सह विरोधी पक्षीय नेत्यांना, कार्यकर्त्यांना, राजकीय नेत्यांना शिक्षकांना, चित्रकारांना, पत्रकारांना, वकिलांना, अभियंत्यांना, साहित्यिकांना, उद्योगपतीना आदीसारख्या सर्व घटकांना दडपशाहीने दडपून न टाकता समाजाच्या आणि देशाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पाऊले उचलावी तरच लोकशाहीला सोन्याचे दिवस येतील. कारण तुम्हा आम्हा आणि सर्वांच्या रक्षणासाठी सरहदीवर जे जवान तैनात आहेत, जी पोलीस यंत्रणा डोळ्यात तेल घालून आपले रक्षणार्थ उभे ठाकले आहे त्यांच्या त्यागाचे काय? त्या ,शहिदांच्या, क्रांतीकारांच्या बलिदानाचे काय? म्हणून याठिकाणी गानसम्राजी लता मंगेशकर यांनी म्हटलेले गीत म्हणावेसे वाटते की, ऐ मेरे वतन के लोगों जरा आँख में भर लो पानी... जो शहीद हुअ हे उनकी याद करो कुर्बानी!!!! जय हिंद... जयहिंद... जयहिंद.....

**-सुरेश गायकवाड**
९२२४२५०८७३

# देशात नवीन वर्षात सूर्य प्रथम कुठे उगवणार?

दैनिक वादळ वार्ता

तुम्ही अशा ठिकाणी गेलात जिथे २०२६ चा सूर्योदय भारतात पहिला असेल. आपण आपल्या मित्रांसह, कुटुंबासह किंवा अगदी एकट्याने येथे सहलीची योजना आखू शकता आणि नवीन वर्षाच्या सूर्योदयाचे स्वागत करणारे पहिले होऊ शकता. बहुतेक लोकांना सूर्योदय आणि सूर्यास्त पाहायला आवडते आणि जर ही जागा पर्वत, झाडांनी वेढलेली असेल तर तो क्षण आणखी सुंदर बनतो, परंतु विचार करा की नवीन वर्षाला, जेव्हा तुम्ही संपूर्ण देशात पहिला सूर्योदय पाहाल तेव्हा तुम्हाला स्वतःमध्ये किती आनंद वाटेल आणि तो क्षण तुमच्यासाठी कधीही विसरला जाणार नाही. तुम्ही ते तुमच्या कॅमेऱ्यात कॅप्चर देखील करू शकता. तुम्हाला नवीन वर्ष २०२६ मधील पहिला सूर्योदय सूर्याच्या किरणांवर पृथ्वीवर पोहोचताना पाहायचा असेल तर तुम्हाला डोंग गावात जावे लागेल. हे गाव भारताच्या ईशान्य अरुणाचल प्रदेश राज्यातील अंजु जिल्ह्यात आहे. पर्यटकांसाठी हे एक अतिशय खास ठिकाण आहे, कारण येथील नैसर्गिक दृश्यही आश्चर्यकारक आहे.



डोंग गावात सूर्याची किरणे प्रथम पृथ्वीवर पडतात. यामागचे कारण येथील भौगोलिक स्थान आहे. सूर्य पूर्व दिशेकडून उगवला आणि देशाच्या पूर्वेकडील भागात (ज्याला भारताचा पूर्व बिंदू म्हणूनही ओळखला जातो) पडतो आणि तो उंचावर स्थित आहे. या कारणास्तव, येथे सूर्योदय उर्वरित ठिकाणांच्या सुमारे एक ते पाऊण तास आधी असतो, म्हणून जर तुम्हाला येथे सूर्योदय पाहायचा असेल तर तुम्हाला ४ वाजण्यापूर्वी जागे व्हावे लागेल, कारण साडेचार ते साडेपाच दरम्यान सूर्योदय हवामानानुसार होतो.तुम्ही दिल्लीहून किंवा कोठूनही डोंग गावात पोहोचला असाल तर तुम्हाला विमानाने आसाम (गुवाहाटी किंवा डिब्रुगड) येथे जावे लागेल. हे अरुणाचल प्रदेशातील अंजु जिल्ह्याजवळ (जिथे डोंग गाव आहे) स्थित आहे. याशिवाय आपण ट्रेनने दिब्रुगड (ऊहठऋ) जाऊ शकता किंवा तिनसुकिया (ढडघ) जाण्यासाठी ट्रेनने जाऊ शकता. येथून तुम्हाला रस्त्याने अंजु जिल्ह्याचे मुख्यालय तेझू येथे जावे लागेल, ज्यासाठी आपण बस किंवा टॅक्सी घेऊ शकता. ह्याच्या पुढे वालोंग आहे येथून तुम्ही काही वेळ ट्रेकिंगनंतर डोंगला पोहोचाल जेथे तुम्ही २०२६ चा पहिला सूर्योदय पाहू शकता . ट्रॅकवर जाणे देखील आपल्यासाठी येथे एक चांगला अनुभव असेल.

डोंग व्हॅली खास आहे कारण देशात प्रथम सूर्योदय होतो, याशिवाय तुम्हाला येथील नैसर्गिक सौंदर्य पाहायला मिळेल. पर्वतांनी वेढलेली लोहित नदी दगडांनी वाहते, मग तिचे स्वच्छ पाणी निळे दिसते, ज्याचे सौंदर्य आपण शब्दात वर्णन करू शकणार नाही. येथे आपण टिलाम हॉट स्प्रिंगला भेट देऊ शकता. डोंग ट्रेकनंतर ही अशी जागा आहे जिथे उबदार आणि मिनरल वॉटरमध्ये डुबकी घेतल्याने हिवाळ्यात आराम मिळेल. सांधेदुखी कमी करण्यासाठीही हे फायदेशीर मानले जाते. सिको डिडो धबधबा डोंग व्हॅलीजवळून वाहतो. याशिवाय तेजूच्या जवळ हवा कॅम्प आहे जिथून दरीचे दृश्य पाहण्यासारखे दिसते. आपण डोंग व्हिलेजची संस्कृती जवळून पाहू शकता जो एक पूर्णपणे वेगळा अनुभव असेल, कारण येथे मेयो जमात राहते.

# हिवाळ्यात गरम पाणी पिताय?

दैनिक वादळ वार्ता

आजच्या काळात खाण्यापिण्याच्या पद्धती खूप बदलल्या आहेत. हा सोशल मीडियाचा काळ आहे. म्हणून लोक रील्स पाहून आपला दिनक्रम ठरवू लागले आहेत. याच पद्धतींपैकी एक म्हणजे हिवाळ्यात फक्त गरम पाणी पिणे. असा समज आहे की हिवाळ्यात गरम पाणी केवळ पोटाची चरबी कमी नाही तर हिवाळ्यात सर्दी-खोकल्यापासूनही वाचते. एक उपाय तर असा पसरला आहे की फक्त गरम पाणी पिण्याने घशात आणि फुफ्फुसात जमा झालेला कफ बाहेर निघून जातो. कधीकधी हे ट्रेंड शरीरासाठी फायद्याऐवजी नुकसानकारक ठरतात. तुम्हीही दिवसभर थर्मल बॉटलमध्ये ठेवलेले पाणी तर पित नाही ना? आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की असे करणे शरीरासाठी बरोबर आहे की चूकीचे?तज्ज्ञ सांगतात की गरम किंवा कोमट पाणी पिण्याने आपले पचन व्यवस्थित राहते. पण खाण्यापिण्याची कोणतीही पद्धत अवलंबण्यापूर्वी त्याचे फायदे आणि तोटेही जाणून घेतले पाहिजेत.



सीनियर डायटिशियन गीतिका चोप्रा सांगतात की याचे उत्तर संतुलनासह समजणे गरजेचे आहे. गरम पाण्याचे स्वतःचे फायदे आहेत पण ते दिवसभराचे नियम बनवून टाकणे प्रत्येक शरीरासाठी योग्य नसते. थंडीच्या हंगामात गरम किंवा कोमट पाणी पिण्याने पचन चांगले होते. हे आतड्यांना आराम देते, रक्ताभिसरण सुधारते, बद्धकोष्ठता, सूज आणि जडपणा अशा हिवाळ्यातील समस्या कमी करते.गरम पाणी शरीराच्या अंतर्गत तापमानाला टिकवून ठेवण्यातही मदत करते. अशा प्रकारे थंडी जाणवण्याची भावना कमी होते. तज्ज्ञ सांगतात की म्हणूनच सकाळी उठल्यावर आणि जेवणाच्या आसपास गरम पाणी पिणे वैज्ञानिकदृष्ट्या फायदेशीर मानले जाते.

त्यांनी सांगितले की जर तुम्ही दिवसभर फक्त गरम पाणीच पिता तर काही लोकांमध्ये याचा उलट परिणामही होऊ शकतो. जास्त गरम पाणी पिण्याने तोंड आणि घशात कोरडेपणा, आम्लपित्त किंवा पोटाची जळजळ होऊ शकते. विशेषतः ज्या लोकांचे पचन आधीपासून संवेदनशील असते त्यांच्यात. काही प्रकरणांमध्ये शरीराची नैसर्गिक तहान लागण्याची यंत्रणा देखील बिघडते. तज्ज्ञांच्या मते हायड्रेशन कमी होऊ शकते.अजून एक सामान्य उपाय आहे की फक्त गरम पाणी पिण्याने चरबी वितळते किंवा वजन कमी होते. विज्ञानानुसार गरम पाणी चयापचयाला थोडेशी साथ मिळते. पण हा कोणताही चमत्कारी उपाय नाही. आहार, झोप आणि व्यायामाशिवाय गरम पाण्याने कोणताही मोठा बदल येत नाही. थंडीत कोमट पाणी पिणे चूकीचे नाही, पण फक्त गरम पाणीच प्यावे हेही आवश्यक नाही. सर्वोत्तम पद्धत म्हणजे सकाळी आणि जेवणाच्या वेळी कोमट पाणी घ्यावे. बाकी वेळी सामान्य पाणी प्या. जी गोष्ट पचन, हायड्रेशन आणि आरामाला संतुलित करेल, ती वैज्ञानिकदृष्ट्या बरोबर असते.

# अबॅकस आणि वैदिक गणित शिक्षणा मधून विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा विकास

दैनिक वादळ वाता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शहरात राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेला राज्यासह देशभरातून १०२३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. ग्लोबल व्हिजन फाउंडेशन पुणे संचलित इन्स्पायर अबॅकस ण्ड वेदिक मॅथ अकॅडमीच्या वतीने अकॅडमीच्या अध्यक्षा अर्चना शेळके व सचिव दादासाहेब शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा घेण्यात आली.

शहरातील नगर-कल्याण महामार्गावरील सुखकर्ता लॉन येथे पार पडलेल्या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठमोठी गणिते झटपटपणे सोडवून अवघ्या ५ मिनीटाच्या आतमध्ये आपला पेपर सोडवित उपस्थितांना अवाक केले. झटपट गणित सोडविण्याची परीक्षा यावेळी रंगली होती.

या स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम अहिल्यानगर डाक विभागाचे प्रवर अधिक्षक विकास पालवे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. विकास पालवे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा विकास होण्यासाठी अबॅकस आणि वैदिक गणित शिक्षण ही काळाजी गरज आहे. शालेय शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांचा गणित हा विषय सोपा करण्यासाठी त्यांना अबॅकस शिक्षण फायद्याचे ठरते.




देशभरातील विद्यार्थ्यांची गरज ओळखून इन्स्पायर अबॅकस ण्ड वेदिक मॅथ अकॅडमी विद्यार्थ्यांना देत असलेल्या अबॅकस व वैदिक गणिताच्या शिक्षणाबद्दल त्यांनी कौतुक केले.या कार्यक्रमासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप व आष्टी भाजपाचे युवा नेते जयदत्त धस यांची विशेष उपस्थिती लाभली. या अबॅकसच्या राष्ट्रीय स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळविलेले निती थोरात, रुद्र सोले, अंजुश्री रासकर व हर्ष कोठे या विद्यार्थ्यांना अकॅडमीच्या वतीने प्रत्येकी ३ हजार रुपयांचा धनादेश देऊन गौरविण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशभरातून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी मेघराज तांबे, समर्थ धोंडे, शिवराज चितळकर, राजवीर परदेशी, अनुष्का वायभासे, प्रणित देसाई, संस्कृती पाटील, शोर्या काटे, प्रिया शेळके, शोर्य वामन, आराध्य मते, वैष्णवी झांजे, शिवतेज जाधव, सलोनी देशमुख, प्रथमेश धोंडे, आर्य आरडे, स्नेहल परकाळे, पार्थ पवार, सहर्ष कोल्हापूर, आर्या गायकवाड, गितांजली खलाशे, शिवांश खंदारे, अनन्या घावटे, एस. हासीनी या विद्यार्थ्यांना चॅम्पियन ट्रॉफीचे पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

अकॅडमीत उत्कृष्ट शिक्षक म्हणून कार्य करणाऱ्या कोमल कर्डुळे यांना टू स्टार अवार्ड, मनीषा रकटाटे, शैला देसाई यांना स्टार टिचर अवार्ड तर चंदा हजारे व सोनिया आरडे या शिक्षिकांना बेस्ट टीचर अवॉर्ड देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी आष्टी पंचायत समितीचे माजी उपसभापती गोपाळभाऊ रकटाटे, श्रीगोंदा माजी कृषी अधिकारी बलभिम शेळके, शहर सहकारी बँक चे व्हाईस चेअरमन प्रा. माणिकराव विधाते, महाराष्ट्र व गोवा चे कार्याध्यक्ष संतोष यादव, आष्टीचे मा. तहसिलदार शहादेव गिते, ड. कांतीलाल गव्हाणे, पत्रकार अनिल हिवाळे, बा.बा. दानवे शै. संकुल चे अध्यक्ष विजयकुमार दानवे, आष्टी तहसिल मंडळ अधिकारी गजेंद्र राठोड, मनपा प्राथ. शाळा ओंकारनगर चे मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी, युवा नेते दादासाहेब गव्हाणे, युनियन बँक ऑफ इंडिया चे मॅनेजर शरद वाळके, व्ही प्राईम अकॅडमी च्या संचालिका विद्या यादव, महानगरपालिका शिक्षण संघ महाराष्ट्र राज्य चे राज्य सचिव अरुण पवार, स्टेट बँक ऑफ इंडिया चे मॅनेजर प्रविण रकटाटे, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष अमितजी पवार, मनपा अहिल्यानगर चे नगरसेवक प्रकाशजी भागानगरे, नगर भाजपा तालुकाध्यक्ष दादासाहेब दरेकर, वर्षाताई कबाडी, शैलेश पाटील, बापु शिंदे सर, नामदेव पाटील वाळके, संतोष लांडगे, सुरेश बनसोडे, नामदेव रकटाटे, रावसाहेब गावखरे आदींसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अकॅडमीच्या अध्यक्षा अर्चना शेळके, सचिव दादासाहेब शेळके, संचालक रविंद्र रकटाटे, सार्थक शेळके, श्रीतेज रकटाटे व सर्व शिक्षकांनी परीश्रम घेतले. प्रास्ताविकात संस्थेचे सचिव दादासाहेब शेळके यांनी अकॅडमीची व स्पर्धेची माहिती दिली .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी जोशी यांनी केले. आभार संस्थेचे संचालक रविंद्र रकटाटे यांनी मानले.

# सिंधी जनरल पंचायत आयोजित वॉकथॉन स्पर्धेला प्रतिसाद

## अबाल-वृद्धांचा उत्साहात सहभाग

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

येथील सिंधी जनरल पंचायत, ट्रस्टच्या वतीने वर्षअखेरीचे निमित्त साधून सिंधी समाजासाठी आयोजित केलेल्या 'सिंधी एकता दौड' अर्थात वॉकथॉन- २०२५ स्पर्धा काल मोठ्या उत्साहात पार पडली. यात लहान मुले, तरुण-तरुणी, महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. भुतकरवाडी येथील सिंधू मंगल कार्यालयापासून ताठेमळा, पंपिंग स्टेशन रोड मार्गे कराळे हेल्थ क्लब व पुन्हा सिंधू मंगल कार्यालय असा अंदाजे पाच किलोमीटरची ही स्पर्धा होती.




प्रारंभी सकाळी ६:४५ वाजता स्पर्धेत नावनोंदणी केलेल्या स्पर्धकांनी आपली उपस्थिती नोंदविली. त्यानंतर सर्वांनी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वॉर्मअप व झुंबा केला. नंतर मुख्य मंचावरील सिंधी जनरल पंचायतचे अध्यक्ष महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, जय रंगलानी, प्रदीप आहुजा, राजकुमार गुरनानी, सुनील बजाज, प्रेम बजाज, कपिल किंगर, विनोद कुकरेजा, इंदर बजाज, प्रा. चेतन नवलानी आदी मान्यवरांसमवेत राष्ट्रगीत पार पडले. त्यानंतर मान्यवरांनी झेंडा दाखवून स्पर्धेला सुरुवात करून दिली.

स्पर्धेचा घोषवाक्य एकता ही सम्मान है, शक्ती है और पहचान है असा होता. ही स्पर्धा स्वास्थ्य, एकता व सामाजिक बांधिलकीला समर्पित होती. स्पर्धा पूर्ण केलेल्या स्पर्धकांना पदक देऊन गौरविण्यात आले तसेच याप्रसंगी पाच भाग्यवंत स्पर्धकांना विशेष पारितोषिके देण्यात आली.पहिल्यांदाच आयोजित स्पर्धेला मिळालेला उदंड प्रतिसाद पाहता सिंधी जनरल पंचायततर्फे दरवर्षी डिसेंबर महिन्यात ही स्पर्धा आयोजित केली जाणार असल्याचे याप्रसंगी घोषित करण्यात आले तसेच वर्षभर नवनवीन उपक्रम आयोजित केले जाणार असल्याचे सांगण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सिंधी जनरल पंचायतचे सर्व कार्यकारिणी सदस्य तसेच प्रा. चेतन नवलानी यांच्या मार्गदर्शनाखाली अक्षय गुरनानी, जितेश माखीजा, राहुल पोपटानी आदि सह अनेक तरुणांनी विशेष परिश्रम घेतले.

शेवटी महेश मध्यान यांनी सर्व स्पर्धकांचे, समाजबांधवांचे तसेच स्पर्धेला लाभलेल्या प्रायोजकांचे विशेष आभार मानले.

# तारकपूर येथील गुरुद्वारा कुंदनलालजी येथे श्री गुरु गोविंदसिंहजी यांची जयंती उत्साहात साजरी

## गुरु गोविंदसिंहजी यांच्या त्याग, शौर्य, समता व मानवतेच्या शिकवणीचा संदेश

## रमेश खुराणा व जगदीश बजाज यांना गुरु नानक देवजी सेवा पुरस्कार प्रदान

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

तारकपूर येथील गुरुद्वारा कुंदनलालजी येथे शीख धर्माचे दहावे गुरु श्री गुरु गोविंदसिंहजी यांची ३५९ वी जयंती (प्रकाश गुरुपूरब) मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यानिमित्त गुरुद्वारामध्ये दिवसभर धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. 'बोले सो निहाल, सत श्री अकाल' या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेला.

या सोहळ्यानिमित्त गुरुद्वारामध्ये कीर्तन, कथेचा कार्यक्रम, गुरुबाणीचे पठण व प्रवचनांचे आयोजन करण्यात आले होते. शीख समाजासह शहरातील विविध समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन व लंगरचा लाभ घेतला. धार्मिक कार्यक्रमांमधून गुरु गोविंदसिंहजी यांच्या त्याग, शौर्य, समता व मानवतेच्या शिकवणीवर प्रकाश टाकण्यात आला.



दरवर्षी देण्यात येणारा प्रतिष्ठेचा गुरु नानक देवजी सेवा पुरस्कार रमेश खुराणा व जगदीश बजाज यांना यंदा गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संजय आहुजा, राजेंद्र कंत्रोड, जसपाल कुमार, अनिश आहुजा, जितू गंभीर, ब्रिजमोहन कंत्रोड, बबलू आहुजा, निपू धुपद, ड. काकडे, करण आहुजा, अमन खुराणा, गुलशन कंत्रोड, काकू बाबाजी, विनायक कुलते, सचिन फुलारे, मोहिते पंजाबी, जय रंगलानी, गिरीश नवलनी, किशोर कंत्रोड आदींसह समाजबांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सचिन जगताप म्हणाले की, शीख व पंजाबी समाजाने धर्म, समाज व देशासाठी दिलेले बलिदान सर्वोच्च आहे. गुरु गोविंदसिंहजी यांनी सत्य, धैर्य, समानता व मानवतेचा संदेश दिला. आजही हा समाज त्या मूल्यांची जपणूक करत माणुसकीची वाटचाल करीत आहे. सर्व समाजांनी त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेण्याची गरज आहे, असे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमास धनंजय जाधव, जय भोसले व इंजि. केतन क्षीरसागर यांनी भेट देऊन समाजबांधवांना गुरु गोविंदसिंहजी जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. गुरुद्वारामध्ये गुरु नानक देवजी (जी.एन.डी.) ग्रुप, वाहे गुरु सेवा ग्रुप, एस.पी. सेवा ग्रुप यांच्या वतीने लंगरचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यासाठी मोहित पंजाबी यांचे देखील सहकार्य लाभले. यावेळी लंगरचा भाविकांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गुरुद्वारा समिती व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.



**लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पा. यांच्या ९ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात दीपप्रज्वलन प्रसंगी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पा. पद्मश्री विठ्ठलराव विखे पा.सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष युवानेते डॉ. सुजय दादा विखे पा. माजी मंत्री श्री. अण्णासाहेब म्हस्के, युवानेते ध्रुव विखे पा. , श्री. वसंतराव कापरे, श्री. विनायकराव देशमुख, डॉ.भास्करराव खर्डे पा. आदी दिसत आहेत.**

# प्रेस क्लब मूलचा सन्मान सोहळा शहर विकासासाठी एकत्रित संकल्प

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

प्रेस क्लब मूलच्या वतीने मूल नगर परिषदेत नुकतेच निर्वाचित झालेल्या नगराध्यक्षा व सर्व नगरसेवकांचा शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन भव्य सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम रामलीला भवन, मूल येथे उत्साहात संपन्न झाला.या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रेस क्लबचे अध्यक्ष नासिर खान होते. व्यासपीठावर नगराध्यक्षा एकता समर्थ, ज्येष्ठ पत्रकार विजय सिद्धावार, नगरसेवक प्रशांत समर्थ तसेच सामाजिक कार्यकर्ते भगवान ढोरे उपस्थित होते. प्रेस क्लबचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते नगराध्यक्षा व नगरसेवकांचे स्वागत करून त्यांना शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह प्रदान



करण्यात आले.यावेळी अध्यक्ष नासिर खान, ज्येष्ठ पत्रकार विजय सिद्धावार, नगरसेवक प्रशांत समर्थ, नगराध्यक्षा एकता समर्थ, नगरसेवक अशोक येरमे, विलास कागदेलवार, नगरसेविका लिना फुलझेले तसेच नलिनी आडपवार यांनी आपले मनोगत व्यक्त करत मूल शहराच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. याच कार्यक्रमात पत्रकार भोजराज गोवर्धन यांची जिल्हा सहकारी बोर्डावर संचालक म्हणून अविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचाही शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात मूल शहराचे पहिले नगराध्यक्ष धनजीभाई शहा यांच्या प्रतिमेला अभिवादन करून करण्यात आली. यावेळी प्रेस क्लबच्या मागणीनुसार गांधी चौक ते विश्रामगृह या रस्त्याला धनजीभाई शहा यांचे नाव देण्याची घोषणा करण्यात आली. तसेच मूल शहरात त्यांच्या नावाने नवे सभागृह उभारण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेस क्लबचे सदस्य डॉ. आनंदराव कुळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन नितेश मॅकलवार यांनी केले. कार्यक्रमास सर्व नगरसेवकांसह शहरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगरसेवक राकेश रत्नावार यांच्या शुभेच्छाही यावेळी वाचून दाखविण्यात आल्या.

# मुंबईमध्ये भेसळयुक्त दूध पोलिसांनी पकडले

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई मधील अंधेरी पश्चिम येथे बनावट दूध बनवणारी टोळी पकडली गेली आहे. बनावट दूध म्हणजे दुधात पाणी मिसळणे नव्हे तर दुधात डिटर्जंट, युरिया असले घातक केमिकल मिसळत होते. हे दूध लहान मुल पितात..!! विचार करा आपण आपल्या हाताने काय देत आहोत लेकराला.

लोकांना वाटत मोठ्या शहरात राहतो म्हणजे आपण लै भारी लाईफस्टाईल जगतो. पण विश्वास ठेवा सगळ्यात दळभद्री लाईफस्टाईल ही शहरात राहणाऱ्या मिडल,लोअर क्लास वाल्यांची असते. बऱ्याच जणांना हे पटणार नाही पण हे सत्य आहे. केमिकल टाकून फ्रेश केलेला भाजीपाला, भेसळयुक्त पनीर , दूध, गटारातील पाणी फिल्टर करून पुन्हा तेच वापरात येत. दिल्ली येथे तर वेस्ट वॉटर ट्रीटमेंट करून पुन्हा पिण्यासाठी वापरलं जात कारण तिकडे पाण्याचा काहीच ऑप्शन नाही. अरे श्वास घ्यायची हवा पण इथे शुद्ध नाही. पुण्याचा AQI ( Air Quality Index) सातत्याने ३५० च्या पुढे आहे. १०० च्या वर -टख असेल तर ते आरोग्यासाठी धोकादायक असते. इथे माणूस रोज ३००+ AQI मध्ये राहतोय. ट्रॅफिक ची समस्या. जिथे ३० मिनिटात पोहचलं पाहिजे तिथे दीड तास लागतोय. माणूस ना स्वतःसाठी वेळ देतो ना कुटुंबासाठी. शहरात माणूस नुसता धावतोय. जगत अजिबात नाही. मग कोणती गोष्ट शहरात चांगली आहे? पोटाची खळगे भरण्यासाठी एखादी नोकरी मिळते, पैसा मिळतो म्हणून माणूस खुश आहे. पण तो पैसा कमावताना तुझं आणि कुटुंबाच आरोग्य किती धोक्यात आहे याचा अंदाज आहे का? मी अजूनही सांगतो शहर अल्ट्रा रीच लोकांसाठी बनलेले आहेत. शुद्ध गाईचे तूप ३००० रुपये लिटर खाणारी, २०० रुपये लिटर शुद्ध दूध घेणारी, घरात ३५ हजारांचा आणि गाडीत in-built Air purifier असणारी लोक शहरात आनंदाने हेल्दी लाइफ जगू शकतात. दादर मध्ये राहणे परवडते म्हणून ते तिथे ५ कोटीचा फ्लॅट घेऊन राहू शकतात. तुमच्या सारखं अंबरनाथ वरून ३ तास प्रवास करायची गरज नाही. लोकल मध्ये लटकून जायची गरज नाही. मी तर म्हणतो जगातील सगळ्यात दळभद्री लाइफ म्हणजे लोकलचा प्रवास. मी म्हणतो ज्या माणसाचा पापाचा घडा भरलेला असतो त्याला मुंबई मध्ये लोकल ने प्रवास करावा लागतो. रोज सकाळी ७ वाजता उठा, जठराग्नी पेटलेला नसताना जबरदस्ती पोटात कायतरी कोंबा, नंतर धावतपळत स्टेशन वर जा, नंतर लोकांच्या बगलेत नाक खुपसून ऑफिसात जा. आणि रात्री पुन्हा बगलेत नाक खुपसून घरी वापस या. बरीच लोक फक्त झोपायला घरी येतात. ही काय लाइफ आहे का राव? आणि लोक याला मुंबई स्पिरिट म्हणतात! काय घंट्याचं स्पिरिट आहे भावा हे? तुझ्या जिवाला सुख नाही, तुला २ घास शांत खायला टाईम नाही आणि कशाच आलंय हे स्पिरिट? एखाद्या बाईला नवरा बदडून काढतो पण घरात भाजीपाला, तेल मीठ आणून देतो म्हणून ती बाई म्हणते माझा नवरा लै चांगला आहे तसा प्रकार मुंबईत आणि बाकीच्या शहरात राहणाऱ्या लोकांचा आहे. मुंबई आम्हाला जगायला शिकवते, स्ट्रगल शिकवते. आर बाबा याला स्ट्रगल नाही वेगळच कायतरी म्हणतात..


एका मित्राने १ कोटीचा फ्लॅट पुण्यात घेतला आहे. त्या घरात सकाळी ऊन येत नाही. डायरेक्ट ४ नंतर ऊन येत. कपडे वाळण्यासाठी बिचारा तरसून गेला आहे. पिण्याच पाणी सोसायटी मध्ये नाही. रोज पाण्याचा जार घ्यावा लागतो. सोसायटी मध्ये टँकर ने पाणी येत. ही अवस्था आहे सध्या पुण्यात. पुण्यात तर मुंग्या शिराव्या असे लोक शिरले आहेत. पुण्यात असा एक एरिया नाही जिथे गर्दी आणि ट्रॅफिक नाही. माणसं कमी आणि रिक्षा जास्त, जिकडे बघा तिकडे लोक. शहरात राहणारा मिडल क्लास माणूस स्वतःच्या आणि कुटुंबाच्या जीवाशी खेळतोय. यांना विचारलं तर म्हणतात शहरात सुख सुविधा आहेत. कोणत्या सुख सुविधा तु रषषीव करू शकतोस भावा? विमान नगर मधला फ्लॅट घेऊ शकतो? घरात air purifier लावू शकतो? ऑरगॅनिक फूड रोज खाऊ शकतो? पोरांना इंटरनॅशनल स्कूल मध्ये टाकू शकतो? अरे मॉल मध्ये गेलास तर तू सगळ्यात अगोदर zudi मध्ये जातोस. महिन्यात २ वेळा रिलायन्स मॉल मधून एखाद्या बुधवारी ऑफर मधले ५० रुपयांच रींरलरवे घेऊन तू लै भारी लाईफस्टाईल जगतोय अस समजू नको भावा. माझ्या ओळखीचे एक जोडपे आहे. ते तालुका ठिकाणी राहतात. स्वतःच रो हाऊस आहे.दोघेपण साधी नोकरी करतात. ५ किलोमीटर वर गाव असल्याने तिथून सकाळी ताज दूध, फळ, भाजीपाला आणतात. AQI मापात आहे. ट्रॅफिक नाही की गडबड गोंधळ नाही.. पोर ठणठणीत आहेत. चष्मे नाहीत. मोबाईलचं वेड नाही. घरच्या जवळ मोठ पटांगण असल्याने पोर बिनधास्त तिथ खेळतात, मळतात.

Tier १ सिटी राहण्याच्या लायकीच्या अजिबात नाही राहिल्या. नुसता कचरा आणि गटात झाली आहेत ही शहर. ढळशी २३ सिटी मध्ये अजूनतरी जीवनमान खूप चांगले आहे. म्हणाव्या तशा सुख सुविधा आहेत. नगर मध्ये आजही तुम्हाला एकदम ताजा आणि फ्रेश भाजीपाला मिळतो, दूध ताज मिळत, ट्रॅफिक मध्ये १ तास थांबावं लागत नाही.हॉस्पिटल आहेत. कॉलेज भंगार आहेत पण स्कूल चांगले आहेत.आपल्या देशात प्रशासन कायतरी ठोस पावले उचलेल, भेसळ माफियांना धडा शिकवेल, ट्रॅफिक वर नियंत्रण आणेल, प्रदूषण रोखतील या भ्रमातून बाहेर या. जाब विचारला तर जेल मध्ये टाकतील. त्यामुळे आपण आपली काळजी घेणे गरजेचे आहे. . आपल्या पोरांना देश सोडून दुसरीकडे सेटल होण्यासाठी सांगू शकतो पण आपण सध्या देश सोडून जाऊ शकत नाही. ढळशी २३ सिटी मध्ये अजूनही जीवनमान चांगल आहे. खेडेगावात तर नादखुळा लाइफस्टाइल आहे. फक्त तुमच्याकडे उत्पन्नाचं साधन हवं, पैसा हवा. नाहीतर शहरात राहून पुढच्या १० वर्षात फुफ्फुस आणि किडन्या रिकाम्या होण्याची वाट पाहत बसा. मुंबई स्पिरिट वाल्यांनी जास्त लोड घेऊ नये. आज सुट्टी आहे आज आराम करा. उद्या परत लोकांच्या बगलेचा वास घ्यायला

# महानगरपालिकामध्ये नाराजांचा उद्रेक आणि संताप;अनेक ठिकाणी बंडखोरी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

महायुतीमधिल भाजपा आणि शिवसेना ( शिंदे ) पक्षाला महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर मोठ्या प्रमाणात आयात केलेल्या नेत्यामुळे नाराजीला सामोरे जावे लागल्याचे चित्र आहे.उमेदवारी अर्ज दाखल करण्यास काही तासांचा अवधी शिल्लक असताना निष्टावंताना डावलून बाहेरच्यांना उमेदवारी दिल्याने अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांचा उद्रेक झाल्याचे समोर आले आहे.काहींनी नाराजी आणि संपात व्यक्त केला आहे तर सर्वच पक्षांत मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली झाल्याने भाजपासह शिवसेनेपुढे बंडखोरी शमवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.जागा वाटपामुळे भाजप आणि शिवसेना (शिंदे) यांच्यातील १५ ठिकाणी युती फिस्कटली आहे. निवडणुकीच्या तोंडावर शिंदे यांच्या शिवसेनेसह भाजपाने मोठ्या प्रमाणात इतर पक्षातील कार्यकर्त्यांना प्रवेश दिल्याने त्यांना नाराजीचा सामना करावा लागला आहे.याचा सर्वाधिक फटका भाजपाला बसला आहे.उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी काही तास शिल्लक राहिले असताना अनेक इच्छुकांना डावलले गेल्याने अनेक ठिकाणी नाराजी आणि संपात व्यक्त केला गेला.काही ठिकाणी तर नाराजांना आवरण्यासाठी पोलिसांची मदत घ्यावी लागली. छत्रपती संभाजीनगरमध्ये एबी फॉर्म वाटपावरून भाजपात जोरदार राडा झाला.इच्छूकांनी मंत्री अतुल सावे यांच्या कार्यालयात समोर घोषणाबाजी केली.काहींनी संताप बोलून दाखवला तर एका महिलेला अश्रू अनावर झाले. तिकीट मिळाले नाही,म्हणून एका महिलेने अंगावर पेट्रोल टाकून आत्मदहनाचा प्रयत्न केला. नाशिकमध्ये एबी फॉर्मच्या वाटपावरून पळवापळवी आणि राडा झाल्याची घटना घडली आहे.नाशिकमध्येही भाजपमधील अंतर्गत वाद पुन्हा चव्हाट्यावर आल्याचे चित्र होते.अकोल्यामध्येही भाजपमध्ये बाहेरुन आलेल्यांना उमेदवारी दिल्यामुळे नाराजीचे सूर होते.नागपूर मध्येही भाजपामध्ये रोषाचे वातावरण होते. बाहेरून आलेल्यांना प्राधान्य दिले जात असल्याच्या आरोपावरून आज भाजप कार्यकर्त्यांचा संयमाचा बांध फुटला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानाबाहेर कार्यकर्त्यांनी थेट भाजप प्रदेश



नेते चंद्रशेखर बावनकुळे यांना घेरत जाब विचारला.

शिवसेना (उबाठा) पक्षातही नाराजी उफाळून आली आहे.मातोश्रीच्या अंगणातच राजीनामा सत्राला सुरुवात झाली असून, अनेक पदाधिका-यांनी डावलल्याचे कारण देत राजीनामा दिला आहे. प्रभाग क्रमांक ९५ मधून पक्षाने हरी शास्त्री यांना उमेदवारी दिली आहे. माजी नगरसेवक शेखर वायंगणकर यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. वायंगणकर हे अनिल परब यांचे कट्टर समर्थक मानले जातात. बंडाळी टाळण्यासाठी सर्वच पक्षांनी संबंधित उमेदवारांना काल रात्रीच एबी फॉर्मचे वाटप केले. मात्र उमेदवारी न मिळालेल्यांनी बंडाचा झेंडा फडकावला.त्यामुळे मुंबईतील सर्वच राजकीय पक्षांमध्ये बंडखोरीला ऊत आला आहे. मुंबईत ठाकरे गटाच्या सूर्यकांत कोळी, प्रीती पाटणकर, चंद्रशेखर वायंगणकर, अनिल कोकीळ यांना उमेदवारी न मिळाल्यामुळे त्यांनी बंडाचे निशाण फडकावले आहे. तर भाजपचे गजेंद्र धुमाळ, संजय दास्ताने यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. गोरेगावमध्ये भाजपचे विधानसभा महामंत्री संदीप जाधव यांनी पक्षाचा राजीनामा देत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. तर मुलुंडमध्ये विधानसभा महामंत्री प्रकाश मोटे, कमलाकर दळवी यांनीही राजीनामा दिला.चेंबूरमधिल प्रभाग क्रमांक १५५ मधून भाजपने माजी नगरसेवक श्रीकांत शेट्ये यांना उमेदवारी दिली आहे.त्यानंतर भाजपमध्ये मोठी नाराजी उफाळून आली.उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतून भाजपमध्ये गेलेल्या शेट्ये यांना उमेदवारी मिळाल्याने भाजपमधील निष्ठावंत नाराज झाले आहेत.आयात उमेदवाराला संधी देत निष्ठावंतांच्या हाती भोपळा दिल्याने भाजपमध्ये नाराजी पसरली आहे.प्रभाग क्रमांक १५५ मधून माजी नगरसेविका जयश्री खरात, हर्ष साळवे आणि शशिकला शंकर कांबळे इच्छुक होत्या. मात्र भाजपने तिघांना डावलत ठाकरे यांच्या गटातून भाजपात प्रवेश केलेल्या श्रीकांत शेट्ये यांना उमेदवारी दिल्याने नाराजी आहे. त्यामुळे खरात, कांबळे, साळवे यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे. या बंडामुळे भाजपची डोकेदुखी वाढली आहे.निष्ठावंताना डावलल्याने भाजपासह शिवसेनेपुढे बंडखोरी शमवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## उरण तालुक्यातील शिक्षकांचे तंबाखू मुक्त शाळा विषयी प्रशिक्षण संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**



ग्रामीण रुग्णालय उरण, शिक्षण विभाग पंचायत समिती उरण , सलाम मुंबई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत तालुक्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या शिक्षकांचे एकदिवसीय प्रशिक्षण पंचायत समिती उरण येथे संपन्न झाले. सदर प्रशिक्षण साठी प्रमुख अतिथी म्हणून ग्रामीण रुग्णालय उरणचे वैद्यकीय अधीक्षक डॉ बाबासो काळेल, गटशिक्षणाधिकारी श्रीमती निर्मला घरत तर प्रशिक्षण साठी मार्गदर्शक सलाम मुंबई फाउंडेशनच्या श्रीमती सारिका ब्राऊन,दंत शल्यचिकित्सक डॉ.संतोष झापकर अणि जिल्हा रुग्णालय अलिबाग च्या तंबाखू नियंत्रण कार्यक्रमचे सुशील साईकर हे उपस्थित होते. तंबाखूच्या व्यसनाचे प्रमाण वाढल्याने बर्याचदा उपचार घेण्यासाठी रूग्णांना दूरवर जावे लागते त्यामुळे आर्थिक अणि मानसिक त्रास होतो. यासाठी या कार्यशाळेतून शिक्षकांनी मुलांना आयुष्यभर तंबाखू अणि तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहण्यासाठी निश्चिंतपणे मदत होईल तसेच समाजात जनजागृती होईल असे डॉ काळेल यांनी आपल्या मनोगतात सांगितले . तर तंबाखूचे दुष्परिणाम अणि त्यामुळे होणारे कॅन्सर तसेच कोटपा कायदा २००३ याविषयी सविस्तर माहिती डॉ झापकर यांनी दिली. तर तंबाखू मुक्त शाळा याचे महत्व अणि ९ निकष याच्या विषयी समर्पक माहिती सलाम मुंबईच्या श्रीमती सारिका मॅडम यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुशील साईकर यांनी केले. उपस्थित सर्व मान्यवर अणि शिक्षकांचे आभार केंद्र प्रमुख म्हात्रे सर यांनी मानले.

## ठाणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तक्रार निवारण कक्ष व स्वतंत्र हेल्पलाईन सुरु

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**



आगामी ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय व नियमबद्ध रितीने पार पाडण्यासाठी प्रशासनाच्या वतीने स्वतंत्र तक्रार निवारण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. निवडणुकीदरम्यान उद्भवणाऱ्या विविध तक्रारींचे तात्काळ निवारण व्हावे, या उद्देशाने हा कक्ष सुरू करण्यात आला असून नागरिकांनी +९१ ९१५२८ १७२५२ दूरध्वनी क्रमांकावर किंवा tmcelectiongrievancethanecity.gov.in ई-मेलवर संपर्क साधावा असे आवाहन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांनी केले आहे.

निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन, बेकायदेशीर प्रचार, भिंतींवर पोस्टर्स-बॅनर्स लावणे, मतदारांवर दबाव, पैशांचा किंवा वस्तूंचा गैरवापर, खोटी माहिती पसरवणे, मतदान प्रक्रियेशी संबंधित अडचणी, तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांविषयीच्या तक्रारी याबाबत नागरिक या तक्रार निवारण कक्षात संपर्क करू शकतात. प्राप्त होणाऱ्या प्रत्येक तक्रारीची नोंद घेऊन त्यावर तातडीने चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे. तक्रार निवारण कक्षात प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून संबंधित विभाग, क्षेत्रीय अधिकारी, पोलीस प्रशासन व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याशी समन्वय साधून तक्रारींचे वेळेत निराकरण केले जाणार आहे. तक्रार करणाऱ्या नागरिकांची माहिती गोपनीय ठेवली जाणार असून नागरिकांनी निर्भयपणे तक्रारी नोंदवाव्यात, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## वीज कंत्राटी कामगारांचा ऐतिहासिक विजय मेळावा पुण्यात उत्साहात संपन्न; रायगड जिल्ह्यातील कर्मचारी विजय मेळाव्यात सहभागी

दैनिक वादळ वार्ता
**उरण | प्रतिनिधी**

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ (संलग्न : भारतीय मजदूर संघ) यांच्या वतीने वीज कंत्राटी कामगारांचा भव्य विजय मेळावा पुणे येथे मोठ्या उत्साहात पार पडला. ठाणे औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निकालानुसार २२८५ वीज कंत्राटी कामगारांना कायम करण्याचा निर्णय झाल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित या मेळाव्यास राज्यभरातून सुमारे ११६७ वीज कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.या मेळाव्यात रायगड जिल्ह्यातील कर्मचारी सुद्धा मोठया संख्येने उपस्थित होते.या वेळी भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनिल ढुमणे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, हा निकाल कंत्राटी कामगारांच्या हक्कांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असून संपूर्ण देशातील कंत्राटी कामगारांसाठी दिलासादायक ठरणारा आहे.वीज कंत्राटी कामगार संघाने रस्त्यावर उतरून केलेली आंदोलने, पुणे-मुंबई पायी मोर्चा, मंत्रालयावर धडक मोर्चा, नागपूर येथे धडक मोर्चा तसेच संविधान चौकातील उपोषण या संघर्षांची त्यांनी विशेष दखल घेतली. यापुढे विविध उद्योगांतील कंत्राटी व असंघटित कामगारांना लेबर कोडमधील लाभ मिळवून देण्यासाठी संघटनेने अधिक प्रभावी प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी केले.ज्येष्ठ मार्गदर्शक अण्णाजी देसाई यांनी वीज उद्योगातील दीर्घकालीन कामगार चळवळीचा आढावा घेत कंत्राटी कामगारांसाठी संघटनेने मिळवलेली २०% व १९% वेतनवाढ तसेच नोकरी सुरक्षा (जॉब सेक्युरिटी ) संदर्भातील प्रयत्न महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद केले आणि शासनाकडून यावर सकारात्मक निर्णय अपेक्षित असल्याचे मत व्यक्त केले.या मेळाव्यास भारतीय मजदूर संघाचे प्रदेश अध्यक्ष अनिल ढुमणे, ज्येष्ठ मार्गदर्शक अण्णाजी देसाई व ज्येष्ठ वकील विजय वैद्य हे प्रमुख वक्ते होते.राज्यसभा खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी उपस्थित राहून कामगारांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच ऊर्जामंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे कामगारांच्या उर्वरित प्रश्नांबाबत पाठपुरावा करून न्याय मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला.महिला पदाधिकारी श्रीमती बेबी राणी डे व ज्योती कदम यांनी मेधाताईंचे स्वागत केले.१३ वर्षांचा हा संघर्ष अत्यंत कठीण असला तरी जिद्द, चिकाटी व सातत्यामुळे हे सामूहिक यश मिळाले आहे. वीज कामगारांच्या न्याय्य मागण्यांसाठी येत्या काळात राज्यव्यापी आंदोलन अधिक व्यापक स्वरूपात छेडण्याचा ठराव मेळाव्यात एकमताने मंजूर करण्यात आला.हा मेळावा यशस्वी करण्यासाठी पुणे येथील संघटनेचे पदाधिकारी सुमीत कांबळे, निखिल टेकवडे, मार्गदीप मस्के , प्रवीण पवार, त्यांच्या पूर्ण टीम ने मोलाचे योगदान दिले.

## वादळी कट्टा

### पहाट उद्याची

तुझं उगवणं या वर्षातलं शेवटचं
उद्या उगवशील
नवीन संकल्प, नवीन स्वप्नं
आणि नवीन ध्यास घेऊन.
पण मागच्या वर्षात
तू जे काही दिलंस,
ते न विसरण्यासारखं होतं.
तुझं या वर्षातलं शेवटचं उगवण
आणि तुझा सूर्यास्त –
या दोघांमध्येच
जे काही हरवलं,
जे काही सापडलं,
त्यांच्या आठवणी
मागच्या वर्षासोबत
मी सोबत घेऊन जाणार आहे.
मला खूप काही मिळालं,
आणि खूप काही हरवलंसुद्धा
पण तुझ्या उद्याच्या उगवण्यासाठी
कालचा मी
कधीच विसरू शकत नाही.
तो राहील
मनाच्या अंतरंगात,
एखाद्या सुवासित अत्तर
भरलेल्याकुप्पीसारखं



–कवी विलास पोवळे












हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077